# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.रामकृष्ण गुलाबराव पवार, वय ५४ वर्षे, पद ग्रामविकास अधिकारी ग्रामपचायत बोराखेडी वर्ग ३ ता.मोताळा जि. बुलडाणा रा. संतगाडगेनगर, चिखली रोड बुलढाणा ता.जि.बुलढाणा |
| लाच मागणी | ४,००,०००/– रुपये व एक पोते साखर तडजोडीअंती २,०१,०००/– रुपये |
| लाच स्विकारले | पडताळणी दरम्यान १०००/– रुपये फोन–पे व्दारे आणि १,००,०००/– रुपये सापळा कार्यवाही दरम्यान असे एकुण १,०१,०००/– रुपये स्विकारले. |
| घटनास्थळ | चिखली रोडवरील नागरे ठेकेदार यांचे बंगल्यासमोर असलेल्या गाळा क्रमांक ८, सुंदरखेड, बुलडाणा |
| घटना तारीख | दि.३१.०१.२०२३ |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, यातील आलोसे श्री.पवार यांनी तक्रारदार यांना ग्रामपंचायत बोराखेडी येथे तक्रारदार तसेच जयमंदा जाधव यांचे विवाह नोंदणी कोणत्या कागदपत्राच्या आधारे घेण्यात आली त्याबाबतची कागदपत्रे मिळण्याकरीता दिलेल्या अर्जावरुन माहीती पुरविण्यासाठी पंचासमक्ष ४,००,०००/–रूपये व एक साखरेचे पोते ची मागणी करीत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याने पडताळणी कार्यवाही दरम्यान पंच क्र.१ यांचे समक्ष तडजोडीअंती २,०१,०००/– रुपये व एक पोते साखर अशी लाचेची मागणी करुन पडताळणी दरम्यान तात्काळ १०००/–रुपये मोबाईल क्र.९९७०६४९०४३ वर फोन–पे व्दारे स्विकारले. सापळा कार्यवाही दरम्यान उर्वरीत २,००,०००/– रुपये लाचेच्या रकमेपैकी पहीला टप्पा १,००,०००/– रुपये पंच क्र.१ यांचे समक्ष लाच स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले.

तरी यातील आलोसे श्री.रामकृष्ण गुलाबराव पवार, वय ५४ वर्षे, पद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत बोराखेडी, वर्ग–३, ता.मोताळा जि. बुलडाणा रा. संत गाडगे नगर, चिखली रोड, बुलढाणा ता. जि.बुलढाणा यांनी लोकसेवक पदाचा गैरवापर करुन १,०१,०००/– रुपये लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारुन लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन केल्याने आलोसे यांचे विरुध्द पोस्टे बुलडाणा शहर येथे अप.नं. ८०/२०२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही :–
१. मा. श्री. मारूती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
२. मा. श्री. अरुण सावंत, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
३. मा. श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
४. मा. श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा व सापळा पथक एएसआय शाम भांगे, पोहेकॉ. विलास साखरे, पोना. मोहम्मद रिजवान, प्रविण बैरागी, जगदिश पवार, विनोद लोखंडे, सुनिल राऊत, रविंद्र दळवी, मपोकॉ. स्वाती वाणी यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ८८८८७६८२१८ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

Sachin
( सचिन इंगळे )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner